CMYK

सारंगधर बालाजी नगरीची बदनामी, आमदार संजय रायमुलकर यांचा विरोधकावर घणाघात >>पान 2

कल्याणात प्रथमच आयोजित सुपर लीग आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन आ. विश्वनाथ भोईर यांची संकल्पना >>पान 3

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मतदार संघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक >>पान 4

**सुविचार**

प्रयत्न सोडू नका,
सुरूवात नेहमी कठीणच असते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




एकेकाळी राजेश खन्ना यांच्या घराचा एसी दुरुस्त करायचा इरफान खान, त्यानंतर चमकले त्याचे नशीब आणि तो झाला स्टार

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 63 ■ बुधवार, दि. 09 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# हरियाणात सलग तिसऱ्यांदा भाजपचे सरकार

## जम्मू काश्मीरमध्ये काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्सची सत्ता, ४९ जागांसह पूर्ण बहुमत

**चंढीगड : हरिणाया विधानसभेमध्ये पुन्हा एकदा भाजपने बाजी मारल्याचं स्पष्ट झालं असून जवळपास ४९ जागा जिंकल्या आहेत. भाजपने बहुमताचा ४६ हा आकडा गाठला. तर काँग्रेसला ३६ जागांवर समाधान मानाव हरियाणातल्या विधानसभा निवडणुकीत विजयाची हॅटट्रिक करत भाजप तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार आहे. तर दुसरीकडे कलम ३७० हटवल्यानंतर पहिल्यांदाच झालेल्या निवडणुकीत जम्मू काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सनं बाजी मारली आहे. २०१४ मध्ये अवघ्या १५ जागा जिंकणाऱ्या नॅशनल कॉन्फरन्सनं यावेळी तब्बल ४२ जागांपर्यंत मजल मारली आहे. काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या आघाडीने ४९ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे जम्मू -काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीचं सरकार सत्तेत येणार हे निश्चित झालंय.**




काँग्रेस सत्ता स्थापन करणार असली तरी गेल्या वेळच्या तुलनेत काँग्रेसच्या जागा जवळपास निम्म्यानं घटल्यात. गेल्यावेळी भाजपसोबत सत्ता स्थापन केलेल्या मेहबुबा मुफ्तींच्या पीडीपीचा सुपडासाफ झाला. तर भाजपला चार जागांचा फायदा झालाय. पण भाजपनं जिंकलेल्या सगळ्या जागा या जम्मूमधल्या आहेत. काश्मीर खोऱ्यात भाजपला खातंही खोलता आलं नाही. विशेष म्हणजे भाजपचे जम्मू काश्मीर प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना यांचा नौशेरा मतदारसंघात पराभव झाला आहे. त्यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारत पदाचा राजीनामा दिला आहे.

शेतकरी आणि कुस्तीपटूंच्या आंदोलनामुळे हरियाणात भाजपविरोधात वातावरण असल्याचं बोललं जात होतं. सगळ्या एक्झिट



पोलमध्येही भाजपचा धुव्वा उडवत काँग्रेसचं सरकार येणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. पण सगळ्या शक्यता आणि अंदाज खोटे ठरवत हरियाणात भाजपनं घवघवीत यश मिळवलंय.

निकालात सकाळच्या सत्रात काँग्रेस आघाडीवर होती, पण नंतर भाजपनं मोठी झेप घेतली. लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानं हरियाणाच्या भाजपचा हा पहिला मोठा विजय आहे. हरियाणाच्या नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी विजयादशमीच्या दिवशी १२ ऑक्टोबरला होऊ शकतो. आत्तापर्यंत संभाव्य मंत्रिमंडळाला अंतिम रूप दिल्यानंतर तारीख ठरवली जाईल, मात्र १२ तारखेला शपथ घेणार असल्याची माहिती आहे.

वास्तविक, गेली १० वर्षे हरियाणात भाजपची सत्ता होती. अशा स्थितीत अँटी इन्कम्बन्सीसह अनेक बाबी समोर आल्याने भाजपचे नुकसान होताना दिसत होते. पण भाजपने हरियाणा निवडणुकीच्या ७ महिने आधी अशी खेळी केली, ज्यामुळे काँग्रेस अडचणीत आली.

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या ७ महिने आधी भाजपने अचानक तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांना पदावरून हटवून सर्वांना आश्र्चर्याचा धक्का दिला. खरे तर भाजपने २०१९ मध्येही खट्टर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली होती. तेव्हा भाजपला बहुमत मिळाले नव्हते. मात्र, जेजेपीच्या पाठिंब्याने भाजपला सरकार स्थापन करण्यात यश आले.

२०२४ मध्ये भाजपला कोणताही धोका पत्करायचा नव्हता. त्यामुळे निवडणुकीच्या ७ महिने आधी खट्टर यांना हटवून नायबसिंग सैनी यांच्याकडे राज्याची कमान सोपवण्यात आली. सैनी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने हरियाणा विधानसभेची निवडणूक लढवली आणि एका नव्या चेहऱ्याने जनतेसमोर हजर झाले. नायबसिंग सैनी यांच्यावर जनतेने विश्र्वास व्यक्त केल्याचे निकालावरून स्पष्ट झाले आहे. यावेळी भाजप पूर्ण बहुमताने सरकार स्थापन करण्यात यशस्वी होताना दिसत आहे.

हरियाणात भाजपला घवघवीत यश मिळाल्यानं महाराष्ट्रात भाजपचा जल्लोष सुरू झालाय. हरियाणातल्या विजयामुळे भाजपचा आत्मविश्र्वास वाढलाय. लोकसभेतल्या फेक नरेटीव्हचं उत्तर आता थेट नरेटीव्हनं दिलंय, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावलाय. आता महाराष्ट्रातही महायुतीचा असाच विजय होईल, असा भाजपला विश्र्वास वाटतोय. लोकसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यानंतर भाजपचा हरिणाच्या रुपानं पहिलाच मोठा विजय आहे. तसंच जम्मू-काश्मीरमध्येही भाजपची सत्ता आली नसली तरी तिथं त्याच्या जागांमध्ये मात्र वाढ झालीय.

# ये तो सिर्फ झांकी हैं... महाराष्ट्र अभी बाकी है!

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रतिनिधी :हरियाणामध्ये भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक यश मिळवले असून हरियाणातील विजयाची पुनरावृत्ती महाराष्ट्रात होणार, महायुतीचा प्रचंड विजय होणार, असा विश्र्वास भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवार दि.८ रोजी व्यक्त केला. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात बावनकुळे पत्रकारांशी बोलत होते. लोकसभा निवडणुकीत खोटा प्रचार करणारा काँग्रेस पक्ष या निवडणुकीत उघडा पडला, असेही बावनकुळे यांनी नमूद केले.



बावनकुळे म्हणाले की , हरियाणामध्ये भाजपाची सत्ता स्थापन होत आहे. जम्मू- काश्मीरमध्ये भाजपाला मोठे यश मिळाले आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसने मागासवर्गीय समाजाची दिशाभूल केली होती. मात्र आता विरोधकांचा खोटारडेपणा जनतेसमोर उघड झाला आहे. मोदी सरकारच्या विकसित भारताच्या संकल्पाला साथ देत जनतेने भरभरून भाजपाच्या पारड्यात मतदान केले म्हणून हरियाणा, जम्मू - काश्मीरमध्ये इतके मोठे यश मिळाले आहे.

राहुल गांधी यांचे अमेरिकेतील आरक्षणाबाबतचे वक्तव्य ऐकल्यानंतर काँग्रेसचा आरक्षणविरोधी चेहरा समोर आला आहे.जीविताचे ,मालमत्तेचे तसेच संविधानाचे रक्षण केवळ भाजपा करू शकते हा विश्र्वास जनतेच्या मनामध्ये निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटणार आहेत. राज्याच्या विकासासाठी डबल इंजिन सरकारची आवश्यकता आहे लक्षात घेऊन महाराष्ट्रातील मतदारही महायुतीला विजय प्राप्त करून देतील. विरोधकांचे घाणेरडे राजकारण महाराष्ट्रामध्ये हाणून पाडण्यासाठी भाजपा घर चलो अभियान राबविणार आहे . भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता तळागाळातील मतदारापर्यंत पोहोचून काँग्रेसने निर्माण केलेला संभ्रम दूर करून राज्य आणि केंद्र सरकारची विकास कार्य पोहोचवेल. विरोधकांचे जातीपातीचे राजकारण हद्दपार करून सर्व समाजांना एकत्र ठेवण्यासाठी भाजपा प्रयत्नशील राहील असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात निवडणुकीचे वारे पण मविआचे मुख्यमंत्रीपदाबाबत ठरेना, उमेदवाराबाबत संभ्रम कायम!



नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम केव्हाही जाहीर केला जाऊ शकतो. काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी मुंबईत येऊन येथील निवडणुकांबाबत बैठका घेतल्या आहेत. त्यांनी सर्वपक्षीय नेत्यांशी संवाद साधला असून बैठकीत तारखांबाबत मिळालेल्या सूचनांचा विचार केला जाईल, अशी सकारात्मक प्रतिक्रिया त्यांनी दिलीय. दरम्यान, राज्यात निवडणुकांचे वारे वाहू लागलेले असतानाही महाविकास आघाडीत मुख्यमंत्री पदाबाबत काहीच निश्चित झाले नाही. मुख्यमंत्री पदाचा चेहरा देऊन निवडणूक लढवायची की न देता लढवायची यावरूनच संभ्रम निर्माण झालाय.

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने पंतप्रधान पदाचा चेहरा दिला नव्हता. निवडणूक निकालानंतर पंतप्रधान पदाचा चेहरा ठरवला जाईल, अशी भूमिका घेण्यात आली होती. आता पुन्हा अशीच भूमिका घेण्याचे आवाहन शरद पवारांनी दिले आहे. मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्याशिवाय विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यास शरद पवारांनी सांगितले आहे.

काही दिवसांपूर्वी शरद पवारांनी याबाबत सुतोवाच केले होते. मुख्यमंत्री पदाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष आग्रही आहे का असा सवाल त्यांना विचारण्यात आला होता. त्यावर शरद पवार म्हणाले होते की, ''आम च्या पक्षात आम्ही याची चर्चा केली. एक म्हण आहे. मी हे जातीय बोलतोय असं समजू नका. बाजारात तुरी, भट भटणीला मारी. कशाचा काही पत्ता नाही, आजच त्याची चर्चा. अजून निवडणुका व्हायच्या आहेत. सरकार बनवायचं तर त्यासाठी बहुमत पाहिजे. बहुमत मिळालं तर नेता निवडतील. नेता निवडला तर मुख्यमंत्री होईल'', असे शरद पवार म्हणाले. मात्र, यावेळी शरद पवारांनी मुख्यमंत्रीपदासाठी पक्ष इच्छुक नाही, असेही स्पष्टपणे न सांगितल्यामुळे यावरून तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे.

''काँग्रेसने मुख्यमंत्री पदाबाबत दावा केला आहे. उद्धव ठाकरेंनी त्यांना जाहीर सांगितले होते की चेहरा असेल तर समोर आणा मी पाठिंबा देतो. मुख्यमंत्री पदाबाबत लोकांच्या मनात संभ्रम नको. लोकांचा संभ्रम दूर केला पाहिजे ही काँग्रेस आणि शिवसेनेची भूमिका आहे. आणि यात काही चुकीचे आहे असे मला वाटत नाही. खांद्यावर कोणाचं मुंडकं आहे हे दिसले पाहिजे, लोकांमध्ये नुसते धड घेऊन कसे जाणार?'' असं संजय राऊत म्हणाले आहेत.

मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करावा की करू नये यावरून महाविकास आघाडीतील मित्र पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत.

# महाराष्ट्रात दोन-चार दिवसात आचारसंहिता, अजित पवारांचा अंदाज

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी मोठी तयारी सुरू केली आहे. मात्र, निवडणुकांचं बिगुल वाजण्याच्या सर्वजण प्रतीक्षेत आहेत. राजकीय पक्षांनी देखील मोठी तयारी केली आहे, सभा, दौरे, पक्षांतर, भेटीगीटी, उमेदवारांची चाचपणी देखील सुरू आहे, अशातच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणुकीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. दोन चार दिवसात आचारसंहिता लागणार आहे. तुम्ही निवेदन दिल्यावर ती काम मार्गी लागण अवघड आहे असं अजित पवारांनी आज म्हटलं आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत आज उद्योग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, दोन चार दिवसात आचारसंहिता लागणार आहे. तुम्ही निवेदन दिल्यावर ती मार्गी लागणं अवघड आहे. बारामतीचे वातावरण चांगले ठेवण्यासाठी आपण ३० वर्ष प्रयत्न करीत आहोत. लोकसभेला जे काही झालं ते विसरून जाऊ. सगळ्यात जास्त निधी मी बारामतीला दिला आहे. आजपर्यंत आपण घड्याळाचे बटन दाबत आलेलो आहोत परंतु अपवाद लोकसभेचा आहे लोक विधानसभेला घडयाळाच्या चिन्हासमोरच बटन दाबून त्या उमेदवाराला विजयी करा असं आवाहन अजित पवारांनी यावेळी केलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आताच मी सुरज चव्हाणशी फोनवरून बोललो. त्याला मी सांगितलं की, मी आज बारामतीत आहे, आपण भेटूया तो म्हणाला, मी प्रयत्न करतो...


अजित पवार यांनी आधीचं ट्विटर म्हणजेच, एक्स मीडियावर पोस्ट केली होती. त्यांनी लिहिलेलं की, आमच्या बारामतीचा

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातील विविध प्रकल्पांचे ई -भूमिपूजन, उद्घाटन

## राज्यात ७ हजार ६४५ कोटी रुपयांच्या कामांची उभारणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या ९ ऑक्टोबर रोजी राज्यात ७ हजार ६४५ कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विविध प्रकल्पांच्या कामांची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये नागपूर व शिर्डी विमानतळ येथील कामांचे भूमिपूजन आणि राज्यातील नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर येथील विविध कामांचे व शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील नवीन टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन आणि नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.



नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन

केंद्र सरकारने नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता दिली असून या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये ९०० नी वाढ होणार आहे. एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष ४८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होणार आहेत. एकाच शैक्षणिक वर्षात मुंबई, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ (ठाणे) अशा १० नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या मंजुरीच्या ऐतिहासिक निर्णयांमुळे ग्रामीण व दूरस्थ भागात विशेषोपचार आरोग्यसेवेत लक्षणीय सुधारणा होणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ नागपूर येथील नवीन एकीकृत टर्मिनल इमारतीची अंदाजित किंमत अंदाजे ७००० कोटी रुपये असून

सर्व आकारांच्या विमानांसाठी योग्य स्वतंत्र संचालनासह दोन समांतर धावपट्टी, विद्यमान धावपट्टीचे विस्तारीकरण आणि नवीन धावपट्टीचे निर्माण, दरवर्षी १४ दशलक्ष प्रवाशांच्या हाताळणीसाठी ३ लाख चौ. मी. च्या नवीन टर्मिनल इमारतीचा विकास, अंदाजे ९ लाख मेट्रिक टन क्षमतेच्या नवीन कार्गो कॉम्प्लेक्सचा विकास करण्यात येणार आहे. एकाच वेळी सुमारे १०० विमाने सामावून घेण्यासाठी पार्किंग बे करण्यात येणार आहे.

शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ नवीन एकीकृत टर्मिनल इमारतीची अंदाजित किंमत - अंदाजे ६४५ कोटी रूपये असून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांमुळे प्रवाशांना सुखद अनुभव मिळणार आहे. प्रवासी वहन क्षमतेमध्ये वाढ आणि धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे. विस्तारित टर्मिनल इमारतीमुळे शिर्डीमधील स्थानिकांसाठी रोजगार निर्मिती होणार आहे.

CMYK

## आता पीके उतरणार निवडणुकीच्या रिंगणात

प्रशांत किशोर ऊर्फ पीके आता निवडणुकीच्या रिंगणातच उतरणार आहेत. मार्गदर्शकाच्या भूमिकेतून बाहेर पडत त्यांना स्वतःलाच सत्ता राबवायची आहे. कोणतेही यश आणि अपयश प्रयोग करणाऱ्याच्या महत्त्वाकांक्षेवर आणि प्रामाणिक प्रयत्नांवर अवलंबून असते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित नेहरू यांच्या लोकप्रियतेच्या काळात फारसे प्रयोग झाले नाहीत. अर्थात, नेहरू सत्तास्थानी असतानाही त्यांच्याच सोबत असणाऱ्या काही सहकाऱ्यांनी नंतर वैचारिक मतभेदानंतर वेगवेगळ्या भूमिका स्वीकारल्या. नेहरूंच्या नंतर मात्र वैचारिक मतभेदांतून हळूहळू संघर्ष आकाराला येऊ लागला आणि त्यामुळे नेहरू व महात्मा गांधी यांनी ज्या काँग्रेसला लोकांच्या घरात, हृदयात पोहोचवले होते त्या काँग्रेसच्या बदलत्या अवताराला जाहीर आव्हाने दिली गेली. सत्तरच्या दशकात याची सुरुवात झाली आणि त्याचा प्रवास आताच्या प्रशांत किशोर यांच्यापर्यंत येऊन पोहोचला. साधारण दर दहा–पंधरा वर्षांनी भारतात नवे राजकीय वादळ उदयाला येत गेले आणि त्यामुळे सत्तांतरे घडत गेली. सरकार बदलाच्या या खेळाचा सगळ्यांत मोठा फटका काँग्रेसला बसला. प्रशांत किशोर यांच्यासारखाच प्रयोग साधारण दीड ते दोन दशकांपूर्वी राजधानी दिल्लीतच झाला. त्यातून आम आदमी पार्टी नावाचा पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांच्यासारखा महत्त्वाकांक्षी नेता उदयाला आला. केजरीवालांच्या पक्षाला दशकापेक्षा जास्त काळ झाला असला, तरी राजकारणात हा कालावधी अगदीच रांगण्याचा काळ असतो. त्यामुळे त्या प्रयोगात पुढे काय होणार याची उत्तरे अद्याप अनुत्तरित असतानाच प्रशांत किशोर यांनी स्वतःच प्रवाहात उतरण्याचे ठरवले आहे. आपल्या राजकीय इनिंगसाठी त्यांनी बिहारची निवड केली. कारण या राज्याच्या जनतेची मनातली आणि तोंडातली दोन्ही भाषा ते बोलतात. बिहारबाबत असे म्हटले जाते की येथील अल्पशिक्षित माणसालाही त्याच्या गावातील पंचायत आणि चौपालपासून जगातल्या राजकारणाची आणि घटनांची बित्तंबातमी असते. त्यांचे वाचन एकवेळ कमी असेल मात्र संचार चौफेर असतो आणि कान उघडे असतात. त्या अर्थाने देशातील राजकीयदृष्ट्या डॉक्टरेट प्राप्त झालेले हे राज्य आहे. नव्या प्रयोगाला ते कधीच ना म्हणत नाहीत. इंदिरा गांधी यांच्या कथित एककल्ली कारभाराला ब्रेक लावण्याची हाक बिहारमधील नेत्यानेच बिहारच्याच भूमीतून दिली. महात्मा गांधी यांनीही दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर देशव्यापी दौरा केल्यानंतर ब्रिटिशांविरूद्ध पहिला राजकीय संघर्ष येथूनच सुरू केला. बिहारची निवड करण्यामागे प्रशांत किशोर यांनी हाही विचार केला असणार. स्वातंत्र्यप्राप्तीपासून ज्या निवडणुका लढल्या गेल्या त्या मुख्यतः विचारधारेच्या आधारावरच. सुरुवातीच्या काळात विचारांशी असलेली बांधिलकी सात्विक होती. नंतर त्यात भेसळ होत गेली आणि राजकारणातील प्रदूषणही वाढत गेले. भिन्न विचारधारा मांडून लोक निवडणुकीच्या समरात उतरू लागले. लढा विचारधारांचाच असल्याचे भासवले जायचे, मात्र अंतिमतः सर्व लढती केवळ सत्ताप्राप्तीसाठीच असायच्या. जाहीरनामे आणि भाषणांतील राजकीय पक्षांची भाषा वेगळी आणि सत्ताप्राप्तीसाठी केलेली कृती वेगळीच. प्रशांत किशोर यांनाही याचा अंदाज आला होता. राजकीय पक्षांचे झाकलेले हेच स्वरूप त्यांनी उघड करून दाखवले. एकाच वेळी त्यांनी वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या पक्षांसाठी काम करायला सुरुवात केली आणि विशेष म्हणजे बहुतांश वेळी त्यांनी ज्या पक्षाचे काम हाती घेतले आहे त्या पक्षाला एकतर सत्ता राखण्यात यश मिळाले किंवा सत्ता प्राप्त करण्यात यश मिळाले. नरेंद्र मोदी यांची देशात आलेली २०१४ मधील सत्ता हे याचे ठळक उदाहरण. नंतर त्यांचे मोदी आणि त्यांचे सहकारी अमित शहा अथवा एकूणच भाजपच्या रणनीतिज्ज्ञांशी बिनसले असावे. त्यांनी चंद्राबाबू नायडू, नितीश कुमार, ममता बॅनर्जी, काँग्रेस आणि इतरही काही पक्षांना रणनीती आखून दिली. प्रशांत किशोर यांची ही भिन्न विचारधारांच्या पक्षांशी असलेली जवळीक कोणत्याही राजकीय पक्षाला खटकली नाही, हे विशेष. स्वतः प्रशांत किशोरही कोणत्याही राजकीय विचारधारेला अस्पृश्य न मानता त्यांचे काम स्वीकारत गेले आणि स्वत:च्या नावावर गोल करत गेले. त्यातून त्यांनी नकळतपणे भारतीय लोकशाहीवर आणि येथील मतदारांवर एक मोठे उपकार केले. त्यांनी आपल्या या कार्यपद्धतीमुळे हे सिद्ध करून दाखवले की भारतात राजकारण हा एक पेशा आहे आणि सत्ताप्रप्ती हेच त्याचे लक्ष्य आहे. विचारधारेचा त्याच्याशी काही संबंध नाही. ते स्वतः आता त्याच मार्गाने जात आहेत. त्यांची विचारधारा गुलदस्त्यातच आहे. तथापि, समाजातील वंचित घटकांच्या मनातील भाषा ते बोलू लागले आहेत. ज्या राज्यात त्यांना इनिंग सुरू करायची होती तेथे त्यांनी जवळपास अडीच ते तीन वर्षे भ्रमंती केली आहे. त्यातून ते स्वत:च्या पक्षासाठी वेगळी रणनीती तयार करण्यात निश्र्चितच यशस्वी झाले असणार आहेत. पण खरा प्रश्र्न पुढे येणार आहे; केवळ सत्ता मिळवणे हेच त्यांना अपेक्षित आहे की भारतीय राजकारणातील दशा आणि दिशा त्यांना बदलायची आहे. त्यांची महत्त्वाकांक्षा नक्की काय आहे? कोणताही वाद म्हणजे इझम न स्वीकारताही केवळ सामान्य लोकांना संघटित केले जाऊ शकते, पैसा आणि घराणेशाही नसलेल्यांना सत्तेच्या खुर्चीवर बसवले जाऊ शकते हे आणीबाणीच्या वेळेच्या आंदोलनानंतर आणि अगदी अलीकडे दिल्लीतील आपच्या आंदोलनानंतर सिद्ध झाले आहे. तथापि, त्या आंदोलनांतून नेतृत्व तयार झाले की त्यांच्या महत्त्वाकांक्षा बदलतात आणि त्यांची विचारधाराही बदलत जाते हेही आपण पाहिले आहे. प्रशांत किशोर यांचा प्रयोग त्याच दिशेने जाणारा असेल की यातून खरेच काही भले साधले जाईल याकरता थोडे थांबावे लागेल.

# सारंगधर बालाजी नगरीची बदनामी, आमदार संजय रायमुलकर यांचा विरोधकावर घणाघात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** मेहकर नगरी ही सारंगधर बालाजी यांची नगरी म्हणून प्रसिद्ध आहे.मात्र काही राजकारणी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सारंगधर बालाजी नगरीची बदनामी करत आहेत. ही नगरी सारंगधर बालाजी ची नव्हे तर, गद्दारांची नगरी आहे, असे म्हणून विरोधकांनी संपूर्ण मेहकर नगरीतील व मतदार संघातील मतदारांच्या भावना दुखावल्या आहेत .सारंगधर बालाजी यांच्याबरोबरच मतदारांचा अपमान केला आहे. त्यामुळे अशा स्वार्थी व स्वतः गद्दार असलेल्या लोकांना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत धडा शिकवा मतदारांच्या भावनेशी खेळणाऱ्या स्वार्थी लोकांना त्यांची जागा दाखवून द्या, असे आवाहन करीत शिवसेना शिंदे गटाचे आ. संजय रायमुलकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या नेत्यांविरुद्ध सडकून टीका केली.

मेहकर येथे शिवसेना शिंदे गटाच्या वतीने दि.७ ऑक्टोबर रोजी जनसंवाद दौऱ्या निमित्त आयोजित करण्यात आली होती. या जनसेवा यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमाला शिवसेना नेते तथा खा. डॉ.श्रीकांत शिंदे,केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, जिल्हाध्यक्ष बळीराम मापारी, जिल्हाध्यक्ष राजपूत यांच्यासह मतदारसंघातील विविध मान्यवर तसेच शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, महिला शिवसेना पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी आ. संजय रायमुलकर यांनी बोलताना विरोधकांचा चांगलाच समाचार घेत त्यांच्यावर सडकून टीका केली.यावेळी ते म्हणाले की, मेहकर नगरी प्रसिद्ध सारंगधर बालाजी यांची नगरी आहे. मात्र असे असताना विरोधक मात्र स्वार्थापोटी बालाजीच्या नगरीला गद्दाराची नगरी म्हणून हिणवत आहेत. हा सारंगधर बालाजी यांचाच नव्हे तर मेहकर नगरीतील नागरिकांचा, मतदारांचा अपमान आहे. विरोधकांचे आता संतुलन बिघडल्यामुळे ते देवाला सुद्धा राजकारणात घेत आहेत. मात्र मतदार त्यांच्या या वक्तव्याचा नक्कीच हिशोब करून चुकता करतील, असेही आ. संजय रायमुलकर यांनी म्हणत विरोधकांवर टीका केली.

तसेच यावेळी ते म्हणाले की, मेहकर मतदारसंघात इतिहासात आतापर्यंत कधीच एवढा निधी मिळाला नाही. एवढा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाल्यानंतर मेहकर मतदार संघाला ४ हजार कोटींचा रुपयांचा निधी मिळाला आहे. त्यामुळे मेहकर मतदार



संघाचा अवघ्या काही काळातच चेहरा मोहरा बदलणार आहे. विरोधक हे अपप्रचार करून चॉकलेट देणार असल्याचे अफवा पसरवत आहेत.

मात्र मी चॉकलेट देणारा नाही.मी तुमच्यातील एक सामान्य व्यक्ती आहे मी कधीही स्वतःला नेता म्हणून मिरवत नाही तर मी एक तुमच्यातील सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती व एक शिवसैनिक म्हणून तुमच्यासमोर आहे. काम करताना कोणत्याही जाती पातीला महत्त्व न देता कामाला महत्व दिले जात आहे. कोणीही आले तर त्यांना त्यांचे काम पूर्ण करून देण्याची ग्वाही आम्ही घेतली आहे. मुस्लिमांना शादीखाना दिला जात आहे. काम करताना जाती–पंथाला प्राधान्य न देता दिलेले काम पूर्ण करणे हेच आमचे कर्तव्य आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सत्ता आली आहे. हे मात्र विरोधकांच्या पचनी पडले नाही. खरे तर विरोधकच गद्दार आहेत. त्यांनी काँग्रेस सोबत जाऊन शिवसेनेशी गद्दारी केली आहे. तर आम्ही वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेली सत्ता आणली आहे.भाजप सेना एकत्र येऊन महाराष्ट्रात एक नवा इतिहास घडवला आहे.मात्र हे आता विरोधकांना पचनी पडत नसल्याने व त्यांच्या पायाखालची वाळू सरकल्याने आता ते राजकारणात देवाला सुद्धा घेत आहेत. अशी टीका आ. संजय रायमुलकर यांनी विरोधकांवर करीत त्यांचा चांगलाच समाचार घेतला..

## एकेकाळी राजेश खन्ना यांच्या घराचा एसी दुरुस्त करायचा इरफान खान, त्यानंतर चमकले त्याचे नशीब आणि तो झाला स्टार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मोठ्या पडद्यावर आपल्या दमदार अभिनयाने लोकांच्या मनावर छाप सोडणारा अभिनेता इरफान खान आता या जगात नाही. इरफान खान आता या जगात नसला, तरी त्याच्या अभिनयामुळे सर्वजण त्याला ओळखतात. २९ एप्रिल २०२० रोजी त्याने जगाचा निरोप घेतला. सामान्य माणूस ते बॉलीवूड स्टार होण्याचा त्याचा प्रवास खूप कठीण आहे. इरफान खानवर एक काळ असा होता, जेव्हा तो टेक्निशियन होता.

इरफान खानने कधीच विचार केला नव्हता की तो एका टेक्निशियनपासून इतका मोठा स्टार होईल. त्यादरम्यान त्याची भेट राजेश खन्ना यांच्याशी झाली आणि त्याचे नशीबच पालटले. इरफान खाननेच खुलासा केला होता की, तो एकदा राजेश खन्ना यांच्या घरी एसी दुरुस्त करण्यासाठी गेला होता.

दिवंगत अभिनेता इरफान खानने एका मुलाखतीत खुलासा केला होता की, जयपूरमध्ये राहून त्याने आपला खर्च भागवण्यासाठी तांत्रिक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतले होते. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर इरफान मुंबईत आला. मुंबईत आल्यानंतर त्यांना एका कंपनीच्या वतीने फिल्डवर कामाला जावे लागायचे.

यावेळी त्याने अनेक घरांना भेटी दिल्या आणि एकदा त्याला बॉलिवूड स्टार राजेश खन्ना यांच्या घरातील एसी ठीक करण्याची संधी मिळाली. याबद्दल बोलताना, अभिनेता म्हणाला होता, मला आठवते की एका भावाने दरवाजा उघडला आणि त्याने मला विचारले कोण? तर मी म्हणालो AC टेक्निशियन आणि तो म्हणाला ये. अशा प्रकारे मी राजेश खन्ना यांना भेटलो. त्यांना भेटल्यानंतरच मी ठरवले की मलाही अभिनेता व्हायचे आहे.

तो पुढे म्हणाला, मग मी पुन्हा मुंबईहून जयपूरला गेलो आणि काही काम करायचे होते. माझ्या वडिलांनी माझी कोणाशी तरी ओळख करून दिली आणि पंखे दुरुस्त करण्यासाठी मला पंख्याच्या दुकानात बसवले. तेव्हा मला समजले की मी फक्त पैसे कमवण्यासाठी काम करू शकत नाही.

यानंतर त्याने १९८७ मध्ये एनएसडीमधून पदवी घेतली आणि त्यानंतर कामाच्या शोधात सुरुवात केली. इरफान खानने 'सलाम बॉम्बे' मधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. मात्र, यात त्याची भूमिका फारच छोटी होती आणि तीही फायनल कटनंतर काढून टाकण्यात आली. यानंतर १९९० मध्ये 'एक डॉक्टर की मौत' या चित्रपटात त्यांना भूमिका मिळाली.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ७० वे 'राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार' प्रदान

## मिथुन चक्रवर्ती 'दादासाहेब फाळके पुरस्काराने' सन्मानित



नवी दिल्ली, : ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना 'दादासाहेब फाळके जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विज्ञान भवनात ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्र्विनी वैष्णव, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरूगन, माहिती व प्रसारण विभागाचे सचिव संजय जाजू आणि पर्यवेक्षक समितीचे अध्यक्ष व मान्यवर उपस्थित होते. प्रदान झालेले पुरस्कार वर्ष २०२२ चे आहेत.

'ममर्स ऑफ द जंगल', 'वारसा', 'या मराठी चित्रपटांनाही विविध श्रेणींमध्ये सन्मानित करण्यात आले. फिचर फिल्म श्रेणीत ३८ पुरस्कार जाहीर झाले. यात विविध भाषेतील उत्कृष्ट चित्रपटांचाही समावेश आहे. तर नॉन फिचर फिल्ममध्ये विविध श्रेणीमध्ये १८ पुरस्कार जाहीर झाले.

मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार

मिथुन चक्रवर्ती यांनी 'सुरक्षा', 'मृगया', 'डिस्को डान्सर', 'अग्निपथ' यांसारख्या अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये अविस्मरणीय भूमिका साकारल्या आहेत. 'मृगया' (१९७६) या त्यांच्या पहिल्या चित्रपटानेच त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळवून दिला होता. 'डिस्को डान्सर' (१९८२) या चित्रपटाने त्यांना अखंड भारतभर प्रसिद्धी मिळवून दिली. त्यांच्या चित्रपटसृष्टीतील दीर्घकालीन योगदानाबद्दल त्यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सर्वोत्तम माहितीपटाचा पुरस्कार 'मर्मर्स ऑफ द जंगल

नॉन फिचर फिल्म श्रेणीतील सर्वोत्तम माहितीपटाचा पुरस्कार 'मर्मर्स ऑफ द जंगल'या लघुपटला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार चित्रपटाचे निर्देशक व दिग्दर्शक सोहेल वैद्य यांनी स्वीकारला. मर्मर्स ऑफ द जंगल हा एक लघुपट आहे, जो भारताच्या नैसर्गिक वारशाच्या, विशेषतः जंगलांच्या आणि वन्यजीवनाच्या संरक्षणाच्या आव्हानांवर प्रकाश टाकतो. हा लघुपट भारतीय जंगलांचे महत्त्व, त्यांच्यातील विविधता, आणि मानवाच्या हस्तक्षेपामुळे होणारा –हास यावर आधारित आहे. लघुपटाच्या माध्यमातून जंगलांचे संवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. या लघुपटात भारतीय जंगलातील विविध वन्यजीव, वनस्पती, आणि त्यांच्याशी संबंधित समुदायांचे जीवन दर्शविण्यात आले आहे. प्रेक्षकांना जंगलाच्या संरक्षणाची जाणीव करून देणे आणि त्यांच्यामध्ये या मुद्द्यांबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे, या माहितीपटाव्दारे संदेश देण्यात आला आहे.

आणखी एक मोहेंजोदारो यास सर्वोत्तम जीवनचरित्रात्मक ऐतिहासिक पुनर्निर्माण संकलन चित्रपटाचा पुरस्कार

नॉन फिचर फिल्म श्रेणीतील सर्वोत्तम जीवनचरित्रात्मक ऐतिहासिक पुनर्निर्माण संकलन चित्रपटाचा पुरस्कार आणखी एक मोहेंजोदारो या चित्रपटाला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार चित्रपटाचे दिग्दर्शक अशोक राणे यानी स्वीकारला. आणखी एक मोहेंजोदारो हा एक माहितीपट आहे ज्याचे दिग्दर्शन अशोक राणे यांनी केले आहे. या चित्रपटात गिरणगावाची कथा मांडण्यात आली आहे – मुंबईतील कापडगिरण्यांच्या सभोवतालची एक समृद्ध संस्कृती, जी १८५० च्या सुमारास फुलली. 'गिरण्यांचे निवासस्थान' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गिरणगावाने औद्योगिक क्रांतीच्या काळात जन्म घेतला, आणि एक अनोखी एकता अनुभवली. हा समाज सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध, सामाजिकदृष्ट्या लवचिक आणि राजकीयदृष्ट्या जागरूक होतो. अनेक राजकीय चळवळींमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पण १९८० च्या दशकात गिरणगावाच्या विनाशाची सुरुवात झाली.

सर्वोत्तम कला–संस्कृती चित्रपटाचा पुरस्कार 'वारसा (लेगसी)'

नॉन फिचर फिल्म श्रेणीतील सर्वोत्तम कला–संस्कृती चित्रपटाचा पुरस्कार वारसा (लेगसी) या माहितीपटाला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन सुर्यवंशी यांनी स्वीकारला. या चित्रपटात शिवकालीन युद्ध कलेवर आधारित माहितीपटाला देखील पुरस्कार देण्यात आला आहे. 'वारसा' या माहितीपटाची निर्मिती कोल्हापुरातील सचिन बाळासाहेब सूर्यवंशी यांनी केली आहे तर या माहितीपटाला बेस्ट फिल्म नॉन फिक्शन गटातून फिल्मफेअर पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक युद्धतंत्र निर्माण केले होते. त्याचा वारसा आजही कोल्हापुरातील लोक जपतात असून याला शिवकालीन युद्ध कला या नावानेही ओळखले जाते. या माहितीपटातून याच युद्ध कलेचा वारसा कोल्हापुरातील स्थानिक कसे जपतात यासाठी सतत प्रयत्नरत असल्याचे चित्रण केले आहे.

सर्वोत्तम निवेदन आणि आवाजासाठी सुमंत शिंदे यांना पुरस्कार प्रदान

नॉन फिचर फिल्म श्रेणीतील सर्वोत्तम निवेदन आणि आवाजाचा 'मर्मर्स ऑफ द जंगल'या माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना सर्वोत्तम निवेदन आणि आवाजाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सर्वोत्तम बॉलिवुड दिग्दर्शक म्हणून सूरज बडजात्या यांना 'ऊंचाई' चित्रपटासाठी , केजीएफ १: चॅप्टर २' सर्वोत्तम कन्नड चित्रपट आणि सर्वोत्तम स्टंट कोरियोग्राफीचा पुरस्कार, 'काबेरी अंतरधान' सर्वोत्तम बंगाली चित्रपट, 'ब्रह्मास्त्र' या हिंदी चित्रपटासाठी बॉलिवुड संगीतकार प्रीतमला सर्वोत्तम संगीतकाराचा पुरस्कार, 'फौजा' साठी नऊशाद सदार खान यांना सर्वोत्तम गीतकाराचा पुरस्कार, 'अपराजितो' ला सर्वोत्तम निर्मिती रचनाचा पुरस्कार, 'कांतारा'साठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्तम अभिनेता, 'थिरुचित्राम्बलम'साठी नित्या मेनन तर 'कच्छ एक्सप्रेस'साठी मानसी पारिख यांना सर्वोत्तम अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. वाळवी या चित्रपटला सर्वोत्तम मराठी चित्रपटचा पुरस्कार जाहिर झाला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पिंपरी विधानसभा साहेबांच्या हक्काचीगळ्यात बॅनर लटकवत पिंपरी चिंचवडचे कार्यकर्ते शरद पवारांकडे




दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी/ प्रतिनिधी :** शरद पवारांनी आज पुण्यात पिंपरी चिंचवड मधील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या ..पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयात शरद पवारांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडत असताना याच मुलाखती दरम्यान पिंपरी चिंचवडचे अनेक कार्यकर्ते गळ्यात बॅनर अडकवून शरद पवारांच्या भेटीला आलेले पाहायला मिळाले.. पिंपरी मधून निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी मिळावी कारण पिंपरी विधानसभा साहेबांच्या हक्कांची असुन २००९ पासुन ते २०२४ पर्यंत हा विधानसभा मतदारसंघ शरद पवारांचा राहिला आहे.. आशा आशयाची पोस्ट सगळ्यात अडकवत या कार्यकर्त्यांनी शरद पवारांकडे निष्ठावंतांना तिकीट देण्याची मागणी केली.

### नाशिकहून मनुदेवीच्या दर्शनासाठी चाललेल्या चार चाकी वाहनाचा अपघात, चार जणांचा मृत्यू एक जण गंभीर जखमी





दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/ प्रतिनिधी :** नाशिक येथून मनुदेवीच्या दर्शनासाठी चाललेल्या चार चाकी वाहनाचा अपघात झाला आहे. आज सकाळी चोपडा तालुक्यातील मजरे ओढ फाट्याच्या पुढे चोपड्याहून नाशिक कडे जाणाऱ्या शिवशाही बस व चार चाकी वाहनाची धडक झाली त्यामध्ये तीन जणांच्या मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी आहे सदर भावीक नाशिक येथून मनुदेवी येथे जात असताना त्यांच्या गाडीचा टायर फुटल्याने हा अपघात झाल्याच सांगितले जात आहे. चोपडा उपजिल्हा रुग्णालयात तीन मृतांना आणण्यात आणले आहे तर एक जण गंभीर अवस्थेत आहेत. जखमीवर उपचार सुरु आहे अशी माहिती अधीक्षक डॉक्टर सुरेश पाटील यांनी दिली आहे.

### येवल्यात नवरात्रात सर्वात मोठा घोड्यांचा बाजार, देशभरातून घोडे शोकिंग दाखल



**नाशिक/ प्रतिनिधी :** येवला शहरात ३५० वर्षाची परंपरा असलेला घोडेबाजार हा दर मंगळवारी भरत असतो. येवल्याचे संस्थापक राजे रघुजी बाबा यांनी हा सतराव्या शतकापासून हा घोडे बाजार येवला शहारात भरवण्यास सुरुवात केली होती. नवरात्र काळामध्ये दसऱ्याच्या आगोदर जो मंगळवार येतो त्या मंगळवारी सर्वात मोठा घोड्यांचा बाजार येवला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भरत असून या घोडेबाजार करिता राज्यातून नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून असंख्य घोडे शोकिंग तसेच घोड्यांचे व्यापारी येथे घोडे खरेदी- विक्रीसाठी दाखल झाले होते. चेन्नई असो, कर्नाटक, पंजाब,काठेवाडी,गुज राथ,पंजाब,माथेरान असो अशा अनेक राज्यातून येवला शहरात घोडे दाखल झाले होते.

### हरियाणातील निवडणुकीपूर्वी भाजपबद्दल प्रशांत किशोरांनी काय केले होते भाकित? किती बरोबर ठरला अंदाज?

**मुंबई/प्रतिनिधी :** हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीसाठी आज (मंगळवारी) मतमोजणी सुरू आहे. सुरुवातीच्या ट्रेंडनुसार, हरियाणामध्ये काँग्रेस पुढे आहे आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये भारतीय जनता पक्ष (भाजप) सोबत कडवी लढत सुरू आहे. त्याचवेळी विधानसभा निवडणुकीच्या निकालापूर्वी निवडणूक रणनीतीकार आणि जन सुराज पक्षाचे समन्वयक प्रशांत किशोर यांनी मोठे वक्तव्य केले होते.

# कल्याणात प्रथमच आयोजित सुपर लीग आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन आ. विश्वनाथ भोईर यांची संकल्पना

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याणमध्ये पहिल्यादांच आयोजित करण्यात आलेल्या कल्याण सुपर लीग आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेचे आज दिमाखदार सोहळ्याद्वारे उद्घाटन करण्यात आले. कल्याण पश्र्चिमचे आमदार विश्र्वनाथ भोईर यांच्या प्रमुख संकल्पनेतून आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. लालचौकीजवळील आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके मैदानात या दोन दिवसीय स्पर्धेला प्रारंभ झाला असून युवा समाजसेवक ओम प्रभूनाथ भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

मंगळवार ८ आणि बुधवार ९ ऑक्टोबर अशी दोन दिवस ही स्पर्धा चालणार असून त्यामध्ये कल्याण परिसरातील ३० हून अधिक शाळांच्या फुटबॉल संघांनी सहभाग घेतला आहे. तसेच १५ वर्षे आणि १७ वर्षांखालील खेळाडू असे या स्पर्धेसाठी दोन गट पाडण्यात आले आहेत. सेंट लॉरेन्स आणि आचिव्हर्स या दोन शाळांमध्ये या स्पर्धेचा प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला.

सगळीकडेच आपल्याला क्रिकेटचे सामने आयोजीत केलेले पाहतो. ते पाहता आपल्या परिसरातील अनेक उदयोन्मुख फुटबॉल खेळाडूनी अशा प्रकारची स्पर्धा आयोजित करण्याची आपल्याला विनंती केली होती. या पार्श्र्वभूमीवर कल्याणमधील फुटबॉल खेळाडूंना एक व्यासपीठ मिळावे म्हणून आपण शिवसेनेच्या माध्यमातून प्रथमच अशा प्रकारची स्पर्धा आयोजित केल्याचे आमदार विश्र्वनाथ भोईर यांनी सांगितले. तसेच क्रिकेट स्पर्धेप्रमाणे अशा प्रकारच्या स्पर्धाही आयोजित करण्यासाठी शिवसेनेकडून आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाहीही आमदार भोईर यांनी यावेळी दिली.

या उद्घाटन सोहळ्याला जिल्हाप्रमुख अरविंद मोरे, आमदार विश्र्वनाथ भोईर, विधानसभा संघटक तसेच माजी नगरसेवक प्रभूनाथ भोईर, जयवंत भोईर, माजी परिवहन समिती सदस्य सुनिल खारुक, विभागप्रमुख रामदास कारभारी, डॉ. धीरज पाटील यांच्यासह विभागप्रमुख राम तरे, अंकुश केणे, युवासेना उपशहर प्रमुख मेघन सल्पी, शाखाप्रमुख रोशन चौधरी, दिनेश शिंदे, तुकाराम टेमघरे, सतीश भोसले, रजनी भोईर, सुरेखा दिघे, भारत भोईर, भरत भोईर आणि मोठ्या संख्येने कार्यकर्तेउपस्थितहोते.

# २०५० पर्यंत संपूर्ण मुंबई समुद्रात बुडणार; धक्कादायक रिपोर्ट समोर



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी अनेक पर्यटन स्थळ देखील आहे. ज्याला भेट देण्यासाठी अनेक लोकल लांब लांब वरून येत असतात. मुंबईला या स्वप्नांची नगरी देखील म्हंटले जाते. मुंबईत गेल्यानंतरच माणूस खऱ्या अर्थाने जीवन काय असते. हे जगायला शिकतो. मुंबईमध्ये गेट वे ऑफ इंडिया , पॉईंट कुलाबा, शिवाजी पार्क तसेच सीएम सिटी स्टेशन यांसारखी अनेक ठिकाण आहे. जी मुंबईची शान आहेत. परंतु याच मुंबईकरांसाठी एक अत्यंत वाईट गोष्ट समोर आलेली आहे. ती म्हणजे हाती आलेल्या माहितीनुसार येत्या काही वर्षातच हे संपूर्ण मुंबई पाण्याखाली जाणार आहे. अशी भीती वर्तवण्यात आलेली आहे. जागतिक तापमान वाढीमुळे आता दक्षिण आणि उत्तर ध्रुवावरचा बर्फ वितळायला लागलेला आहे. जर हा बर्फ वितळण्याचा वेग कायम राहिला, तर समुद्राच्या पाण्याची पातळी वाढणार आहे. आणि त्यामुळे २०५० पर्यंत मुंबई संपूर्ण पाण्याखाली जाईल, असा अंदाज कोडी-ऑर्डिनेटर डायनोसॉय या संस्थेने वर्तवलेला आहे.

दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया कुलाबा मलबार हिल,दादर, वरळी, वांद्रे, चेंबूर वर्सो वा हे समुद्राच्या पाण्याखाली जाऊ शकतात. दक्षिण आणि उत्तर ध्रुवावरील बर्फ असाच वितळायला लागला तर मुंबईसाठी हा एक खूप मोठा धोका आहे. परंतु हा धोका केवळ मुंबईसाठीच नाही, तर मुंबई जवळील ठाणे, नवी मुंबईला देखील असणार आहे. त्यातच तापमान वाढीमुळे समुद्राची पातळी देखील वाढत आहे. ही वाढ जर अशीच राहिली तर मुंबई नक्कीच पाण्याखाली जाईल शिवाजी पार्कच्या परिसरात समुद्राचा पाणी यायला सुरुवात झालेली आहे. परंतु हे पाणी येण्याचे प्रमाण आणखी वाढण्याची भीती देखील वर्तवण्यात आलेली आहे.

भारतातील मुंबई आणि कोलकत्ता तील इतर अनेक शहरांना देखील समुद्राच्या पाण्यामुळे मोठा धोका निर्माण होणार आहे. मुंबई सोबत समुद्राच्या पाण्याखाली जाणाऱ्या शहरांमध्ये सुरत, ओडिसा, केरळ आणि तमिळनाडू यांसारख्या शहरांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे २०५० पर्यंत समुद्राच्या पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होणार असल्याची शक्यता देखील वर्तवण्यात आलेली आहे. आणि या समुद्राच्या पाण्याची पातळी वाढली, तर समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या जवळपास दहा देशांच्या लोकसंख्येवर याचा परिणाम होणार आहे. आणि भारत या यादीत सगळ्यात वरच्या स्थानी आहे. केवळ भारतालाच नाही तर जगभरातील अनेक देशांना या समुद्राच्या पाण्याचा धोका वर्तवण्यात आलेला आहे.

आतापर्यंत हवामानाच्या बदलामुळे जगातील पाच शहरे ही समुद्राच्या पाण्याखाली बुडालेली आहे. इजिप्तमधील थॉमीज, इटालियाचे बाया शहर, इंग्लंड मधील डरमेन्ट गाव जमाईकाचे पोर्ट रॉयल आणि अर्जेंटिना मधील विला ही शहरे समुद्राच्या पाण्याखाली बुडालेली आहेत.

# मालेगाव येथील सर्वाच उंच अशी दुर्गा मात्तेची मुर्ती

## शिवा शक्ती नवदुर्गा उत्सव मंडळांने केली स्थापना

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे



**मालेगाव :** सध्या सगळीकडे नवरात्रोत्सवाची धामधूम सुरू आहे जिकडे तिकडे धार्मिक वातावरण तयार झालेले आहे दिनांक ३ आक्टोपासून नवरात्रला सुरवात झाली आहे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शिवाशक्ती नवदुर्गा उत्सव मंडळाने या वर्षी सुद्धा विशेष आकर्षण करून गर्दी खेचलेली आहे यावर्षी तब्बल १८ फुट उंचीची मोरावर बसलेली मनमोहक मन प्रसन्न करणारी अशी मुर्तीची स्थापना केली आहे शिवाशक्ती नवदुर्गा उत्सव मंडळ हे दर वर्षी अगळी वेगळी दुर्गा मातेची स्थापना करीत असते या ही वर्षी सर्व भावीक भक्तांचे मन मोहक करणारी अशी ११ फुट मोरावर विराजमान अशी तब्बल १८ फुट मुर्ती ची स्थापना केली आहे मालेगाव व तालुक्या मध्ये प्रथमच अशी मुर्ती असल्याने भावीकांची मोठ्या संकेने गर्दी होत आहे या नवरात्र उत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे येथे विशेष सजावट करण्यात आलेली आहे उत्साहात भजन आरती करण्यात येत असते मालेगाव शहरात तील व तालुक्यातील अनेक महिला भगिनी पुरुष तसेच आसपासच्या गावातून नागरिक मोठ्या संख्येने दर्शनाला गर्दी करीत आहे

# कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मुरली अलंकार महापूजेचे लाखो भाविकांनी घेतले दर्शन

दैनिक आपला विदर्भ



**धाराशिव/प्रतिनिधी :** शारदीय नवरात्र महोत्सवात आज ८ ऑक्टोबर रोजी मंगळवारी सहाव्या माळेच्या दिवशी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीजींची मुरली अलंकार महापूजा करण्यात आली.श्री तुळजाभवानी देवीजींचे हे रुप अत्यंत मनमोहक आहे. श्री तुळजाभवानी देवीजींची आज नित्योपचार पुजा आणि अभिषेक पूजेनंतर मुरली अलंकार महापूजा मांडण्यात आली.पाचव्या माळेपासून विविध अलंकार रुपातील श्री. देवीजींची पूजा मांडण्यात येत. दररोज नियमित श्री.तुळजाभवानी देवीजींचे विविध धार्मिक विधी विधीवत पार पाडले जातात. उद्या ९ऑक्टोबर रोजी शेषशाही अलंकार महापूजा,१० ऑक्टोबर रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा आणि ११ ऑक्टोबर रोजी महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा होणार आहे.

# २७ गावातील नागरिकांना पाणी प्रश्नाबाबत लवकर दिलासा

## आ.राजू पाटील : सुरू असलेल्या कामाची पाहणी

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी :** अमृत योजनेत डीपीआर तयार न करता फक्त टेंडर काढण्याचे काम केले गेले. टाक्याचे लोकेशन निश्र्चिन केले गेले नव्हते. ज्या जागा निश्र्चीत केल्या होत्या. त्या जागा आपल्या ताब्यात नव्हत्या. त्यामुळे अनेक अडचणी आल्या. अंदाधुंद काम सुरु होते. काही ढिसाळ नियोजनामुळे तर काही मुद्दाम अडचणी आल्या. आत्ता समाधानकारक परिस्थिती दिसते. लवकर अमृत योजना कार्यान्वीत होईल, त्यामुळे २७ गावातील नागरिकांना दिलासा मिळेल. असे मत मनसे आ. राजू पाटील यांनी अमृत योजने अंतर्गत सुरु असलेल्या कामाचा पाहणी दौरा दरम्यान केले आहे. येणाऱ्या निवडणुकीत ठाकरे गटात सुरु असलेल्या एंन्ट्रीवरूनही विरोधाकांना चिमटा काढला आहे.

कल्याण ग्रामीणमध्ये अनेक ठिकाणी अमृत पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु आहे. मात्र या कामात दिरंगाई होत असल्याने नागरिकांना पाणी समस्येचा सामना करावा लागत आहे. मनसे आ. राजू पाटील यांनी योजनेच्या कामावर प्रश्र्न उपस्थित करीत ही कामे जलद गतीने पार पाडली जावीत यासाठी पाठपुरावा केला आहे.आ. राजू पाटील यांनी अधिकारी वर्गासोबत सुरु असलेल्या योजनेच्या कामाची पाहणी केली. सध्या सुरु असलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे. या कामा दरम्यान ढिसाळ नियोजन आणि मुद्दाम कामे थांबविली गेल्याने ही योजना संथ गतीने सुरु होती याकडे त्यानी लक्ष वेधले. आत्ता ज्या प्रकारे कामे सुरु आहे. एप्रिल अखेरपर्यंत ही योजना कार्यान्वित होईल,असा विश्र्वास आमदार राजू पाटील यांनी व्यक्त केला आहे. तसेच यावेळी मनसे आ. राजू पाटील यांनी हरीणाया आणि जम्मूकश्मीर मधील निवडणूक निकालावर भाष्य केले. ते म्हणाले की जम्मूकश्मीरमध्ये निकाल अपेक्षित होता. हरियाणात भाजप येईल असे वाटले नव्हते. मात्र हरियाणात भाजपने काय जादू केली आहे. ते माहीत नाही. महाराष्ट्रात ही जादू चालते का हे पाहावे लागणार आहे.

ठाकरे गटात इतर पक्षाच्या नेत्यांची एंट्री सुरु झालेली आहे. डोंबिवलीतील शिवसेना शिंदे गटाचे दीपेश म्हात्रे ठाकरे गटात प्रवेश केला आहे. या प्रश्र्नावर मनसे आमदार राजू पाटील यांनी सांगितले की, काही लोक बोलतात की, जाणूनबुजून हे सगळे पेरले गेले आहे. तथ्य निवडणुकीच्या निकालानंतर समजणार आहे. म्हणजे दीपेश म्हात्रे यांच्यासह त्यांच्यासोबत गेलेल्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना शिवसेना शिंदे गटाकडून जाणूनबुजन पाठविले गेले आहे, का असा सवाल आत्ता उपस्थित होत आहे. मंत्री रविंद्र चव्हाण यांना आव्हान देण्यासाठी ही रणनिती आखली गेली आहे का या प्रश्र्नाचे उत्तर निवडणूकीच्या निकालानंतर समजणार आहे.

## विविध वृत्त...

### दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी मोबाईल केले लंपास; पोलिसांनी चार चोरट्यांना मुद्देमालासह केले गजाआड





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहरातील मोबाइल शॉपी चे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी मोबाईल फोन, मोबाईल क्सेसरीज आणि रोख १८ हजार रुपये लंपास केल्याची घटना काल उघडकीस आली होती. अज्ञात चोरटे दुकान फोडून चोरी करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. या घटनेची तक्रार बुलढाणा पोलिसात दाखल होताच सीसीटीव्ही च्या आधारे २४ तासात बुलढाणा पोलिसांनी मुद्देमालासह चार चोरट्यांना अटक केली आहे. चिखली तालुक्यातील उदयनगर येथील भागवत राऊत, ऋषिकेश जाधव, आकाश काळे आणि बुलढाणा तालुक्यातील सागवन मधील अनिकेत हरकळ या चार चोरट्यांना बुलढाणा पोलिसांनी अटक केली आहे.

### दुहेरी हत्याकांड! पैशाच्या वादावरुन दिराने केला भावजयींचा खून, अहिल्यानगरमध्ये खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगरचा अकोले तालुका दुहेरी हत्याकांडानं हादरलाय. अकोले तालुक्यातील बेलापूर गावात दिरानेच त्याच्या दोन भावजयींची कोयत्यानं सपासप वार करुन हत्या केली. हत्येनंतर दीर घटनास्थळावरुन फरार झाला असून आरोपी दिराचं नाव दत्तात्रय प्रकाश फापाळे आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास केला जातोय. तसंच, पोलिसांनी नजीकच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासलं असून आरोपी माथेफिरु असल्याचे सांगितले जातेय.

हत्येचे कारण काय? : जमिनीच्या आणि पैशाच्या किरकोळ वादातून दिरानं दोन भावजयांचा निर्घृण खून केल्याची घटना सोमवारी (७ ऑक्टोबर) दुपारी घडली. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरुन फरार झाला. भरवस्तीत दिवसाढवळ्या हा हत्येचा थरार घडला. दोन्ही महिलांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळले होते. उज्वला अशोक फापाळे आणि वैशाली संदीप फापाळे अशी दोन्ही मृत महिलांची नावं आहेत. आरोपीची आई फ ुलाबाई प्रकाश फापाळे यांच्या डोळ्यांसमोरच ही धक्कादायक घटना घडली असून त्यांनीच पोलिसांनी घडलेला प्रकार सांगितला. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आलेत. या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी हत्या केल्यानंतर हातात कोयता घेऊन रस्त्यानं जात असल्याचं बघायला मिळतंय.

गुन्हा दाखल : घटनेची माहिती मिळताच अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे हे पोलिसांसह घटनास्थळी दाखल झाले होते. त्यानंतर घटनेचा पंचनामा करत दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्याचं काम रात्री उशिरापर्यंत सुरू होतं. पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक रवाना केले असून आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती देण्यात आलीय.

### राजू शेट्टींना लॉटरी, खासदार कोट्यातून मुंबईत म्हाडाचं घर; जाणून घ्या स्वप्नातील घराची किंमत?

**मुंबई/प्रतिनिधी :** राजधानी मुंबईत आपले स्वत:चे घर असाव हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. स्वप्ननगरी असलेल्या मुंबईतील या घरासासाठी राज्यातील आमदार-खासदार व इतर लोकप्रतिनिधीही इच्छुक असतात. त्याम ुळेच, म्हाडाच्या लॉटरीमध्ये लोकप्रतिनिधींसाठीही घराची आरक्षित सोडत असते. गेल्या महिन्यात म्हाडाकडून २०३० घरांसाठी लॉटरीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. आता, या लॉटरीची सोडत आज निघाली असून २०३० जणांचं मुंबईतील स्वप्नाचं घर आता सत्यात उतरलं आहे. त्यामध्ये, अनेक मराठी कलाकारांना घर लागलं असून माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनाही म्हाडाच्या लॉटरीत घर मिळालं आहे. या सोडतीसाठी १ लाख १३ हजार जणांनी अर्ज केला होता. मात्र, या अर्जदारांपैकी फक्त २०३० भाग्यवंतांना हे घर मिळाले आहे. उर्वरित अर्जदारांची निराशा झाली आहे. पण, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी घराचे स्वप्न बघणाऱ्यांना खुशखबर दिली आहे. लवकरच आणखी एक लॉटरी आणणार आहोत, असे सावे यांनी जाहीर केले आहे.

मुंबईमध्ये स्वत:चं घर असावं असं प्रत्येकाचं स्वप्न असतं. महाराष्ट्रात १९७७ साली म्हाडाची स्थापना झाली. तेव्हापासून म्हाडाने सर्वांसाठी घरं बांधली. म्हाडाने आतापर्यंत साडे सात लाख घरं वाटली आहेत. त्यातील अडीच लाख घरं मुंबईतच दिलेली आहेत. प्रत्येकाला आपलं घर मिळावं हाच यामागचा उद्देश आहे. आजच्या लॉटरीसाठी एक लाख तेरा हजार अर्ज आले होते.

# पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत मतदार संघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

## ■ सिद्धार्थ खरात यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या व शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या मेहकर लोणार विधानसभा मतदार संघ आपल्या ताब्यात घेण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने जोरदार फिल्डिंग लावून तयारी सुरू केली आहे. अशातच आता अवघ्या महिना दीड महिना राहिलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील इच्छुक उमेदवारासह पदाधिकाऱ्यांची बैठकीत घेवून मतदारसघातील आढावा घेतला.



गत काही दिवसापूर्वी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या वतीने मेहकर येथे चेतना, संवेदना जागृत करण्यासाठी मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.त्यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या वतीने दि.७ ऑक्टोबर रोजी जनसंवाद यात्रा काढून सभा घेतली. तर पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दि. ७ ऑक्टोबर रोजी मातोश्री येथे मेहकर मतदार संघातील इच्छुक उमेदवार यासह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध विषयावर चर्चा करत मेहकर मतदारसंघातील आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकी संदर्भात आढावा घेतला.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर यासह उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी मतदारसंघातील माहिती देऊन मेहकर विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेचाच उमेदवार विजयी करू अशी ग्वाही मेहकर मतदारसघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना दिली. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर, जिल्हाध्यक्ष जालिंदर बुधवत, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, मेहकर तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, दिपक मापारी, मेहकर शहर प्रमुख किशोर गारोळे, युवासेना शहर प्रमुख ॲड. आकाश घोडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## लाडकी बहिणी योजनेमार्फत निवडणुकीत मत विकत घेण्याचे काम या सरकारच आहे - शरद कोळी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे गटाचे उपनेते शरद कोळी हे बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना खामगाव येथील शिवसेना कार्यालयाला भेट दिली यावेळी त्यांचा कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही फक्त नावाला असून सरकार पक्षातील मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री



हेच ही योजना येत्या काळात बंद करतील. तर ही योजना फक्त निवडणुकीपूर्ती असून महिलांना चे मत विकत घेण्याचा प्रकार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही घाम गाळून पैसा जमा केला नसून हा जनतेचाच पैसा जनतेला वाटायला निघाले आहे. लाडक्या बहीण योजनेची जागा दिली त्यापेक्षा त्या लाडका बहिणीच्या मुलांचे शिक्षण मोफत करायला पाहिजे. बहिणीचे मुलं हे जिल्हा परिषद शिकतात तर तुमचे मुलं परदेशी शिकतात. त्यातही तुमच्या पोटात गोळा उठलेला आहे. जिल्हा परिषद च्या शाळा बंद करून खाजगीकरण करणार आहे. त्यामुळे लायकी बहिणीला दिवसभर काम करून पैसे जमा करून त्या शिक्षणाला लावेल. लाडक्या बहिणीचे घर उध्वस्त हेच त्यांचं षडयंत्र आहे. अशी टीका यावेळी त्यांनी केली आहे.

## महाराष्ट्र हादरला! शाळेच्या टॉयलेटमध्येच बालवाडीत शिकणाऱ्या चिमुरडीवर अत्याचार

**बदलापूर/प्रतिनिधी :** बदलापूरमध्ये दोन चिमुरडीवर अत्यात झाल्याच्या घटनेमुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली असताना अशीच एक धक्कादायक घटना परभणीत घडली आहे. इंग्रजी शाळेत बालवाडीत अर्थात एलकेजीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींवर अत्याचार झाला आहे. शाळेतील स्वच्छतागृहातच तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. मुलीची प्रकृती खालावल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

## समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल्स वर दगडफेक ड्रायव्हरसह एक प्रवासी जखमी





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बीबी :** रात्री अकरा वाजता च्या दरम्यान चायनैज नंबर ३०७.१ जवळील बिबी पोलिस स्टेशन हद्दीत देऊळगाव कोळ ते बीबी कडे जाणाऱ्या ओव्हर ब्रिज पुलावरून समृद्धि महामार्गने जाणारी ट्रॅव्हल्स क्रमांक एम एच २९ इए ६७७७ वर अज्ञात इसमांनी दगड मारला यामध्ये ट्रॅव्हलचा समोरील काच फुटून यामध्ये चालक रुपेश माधव रुडे रा. मांडवा ता डिग्रस व प्रवासी राजेंद्र राठोड वय ४३ रा. महाळुंगी तालुका आर्णी जिल्हा यवतमाळ व अनिल गवई रा.सारंगपूर वाडी जिल्हा यवतमाळ हे किरकोळ जखमी झाले.चालक सहित दोन प्रवासी किरकोळ जखमी झाले सदरची माहिती प्राप्त होताच तात्काळ महामार्ग पोलीस चे पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र राऊत पोलीस हेड कॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे, प्रवीण पोळ व महाराष्ट्र सुरक्षा बल चे जवान श्रावण घट्टे ,नागरे यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून जखमींवर समृद्धी महामार्ग




वरील म्बुलन्स चे डॉक्टर वैभव बोराडे यांनी उपचार केले तसेच पोलीस स्टेशन बीबी चे ठाणेदार संदीप पाटील ,पोलीस अमलदार अरुण सानप ,चव्हाण, भगवान नागरे व इतर स्टाफ नी सदरील पुलावर आजूबाजूला अज्ञात इसमाचा शोध घेतला असता सदर इसम हे मिळून आले नाही. सदर ट्रॅव्हलचालक नी प्रसंगावधान दाखवत ट्रॅव्हल सुरक्षित ठिकाणी बाजूला घेतली .जर चालकाचे नियंत्रण सुटले असते तर मोठा अपघात घडला असता. समृद्धी महामार्गावर महामार्ग पोलीस अधीक्षक नागपूर, श्री यशवंत सोळंके यांच्या आदेशाने पोलीस चे दोन वाहने सतत नाईट पेट्रोलिंग करीत असतात . पोलिसाची नजर चुकून सदर घटना घडत आहे.

सदर घटनेचा पुढील तपास बीबी पोलीस स्टेशन करीत आहे.

## विविध मागण्यांसाठी हिंगणघाट तालुक्यामध्ये शेतकऱ्यांचे सत्याग्रह आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात अल्लीपूर येथे तलाठी कार्यालयाजवळ महाविकास आघाडी व समस्त शेतकरी वर्ग यांच्या वतीने शेतकरी सत्याग्रह आंदोलन करण्यात आले .सत्याग्रह आंदोलनाच्या प्रमुख मागण्या अल्लीपूर गावात दोन स्थाई तलाठी अधिकारी देण्यात यावे,अल्लीपूर परिसरासाठी एक स्थायी नायब तहसीलदाराची नेमणूक करण्यात यावी, जीर्ण झालेले शेतीचे नकाशे नुतनीकरन करून नकाशे तलाठी कार्यालयात लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे, पिक विमा अधिकारी यांना वारंवार तक्रार करूनही बांधावर येत नाही शेतकरी लाभापासून वंचित ठेवणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्यात करण्यात यावी, तुषार व ठिबक सिंचनाचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे. सन २०२३ ते २४ मध्ये राज्य सरकारने घोषित केलेले हेक्टरी रुपये पाच हजार दोन हेक्टर पर्यंत अनुदान ही पीक अट वगळून सरसकट शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा, वारंवार करण्यात येणाऱ्या केवायसी सारख्या जाचक अटी रद्द करण्यात यावी, सन २०२४ ते २५ मधील सर्व शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा सरसकट लाभ देण्यात यावा. यासाठी सदर आंदोलन महाविकास आघाडी व शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आले. या आंदोलनामध्ये महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी व समस्त शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# गरबा नृत्यावर थिरकले बुलढाणेकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासोबतच शहरी व ग्रामीण भागातील मुले, मुली, युवक-युवतींना आपली गरबा दांडिया कला सादर करण्यासाठी व्यासपीठ व संधी मिळावी यासाठी बुलढाणा अर्बन परिवाराच्या वतीने मागील १८ वर्षांपासून गरबा फेस्टिवलचे आयोजन केले जाते.. यावर्षी सुध्दा नवरात्रोत्सवानिमित्त स्थानिक शारदा ज्ञानपीठचे







मैदानावर गरबा फेस्टिवल चे आयोजन करण्यात आले आहे..

बुलढाणा अर्बन गरबा फेस्टिवल २०२४ चे आयोजन आशिया खंडातील सर्वात मोठी असलेली पतसंस्था बुलढाणा अर्बन बँकेने केलेय.. या गरबा फेस्टिवल मध्ये पारंपरिक वेशभूषा व पोशाख परिधान करुन नटलेली बालगोपाल मंडळी, युवक-युवती आणि महिला भगिनींची संगीत गाण्यांच्या ठेक्यावर थिरकणारी पाऊलं, अंबा माता की जय आणि गरबा खेळणाऱ्या सर्वांचाच नवरात्रोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिसुन येत आहे.

नवयुवक आणि नवयुवतीमध्ये या नऊ दिवसांमध्ये प्रचंड उत्साह असतो..ज्यांच्यामध्ये टॅलेंट असते त्यांचे कौतुक केले जाते.. आणि त्यांना योग्य ते बक्षीस सुद्धा दिल्या जाते.. जेणेकरून त्यांना प्रेरणा मिळेल प्रोत्साहन मिळेल अशी प्रतिक्रिया बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी दिली आहे.